124513 पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा (पूर्व) परीक्षा - 2017
2017
दि. 10 सप्टेंबर, 2017

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET No.
**W09**

# प्रश्नपुस्तिका

संच क्र. **A**

## मराठी, इंग्रजी व सामान्य अध्ययन

वेळ : 1 (एक) तास

एकूण प्रश्न : 100
एकूण गुण : 100

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **100** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | शेवटचा अंक |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नांकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

1. 'तू वाईट वागतोस म्हणून तुला बोलणी खावी लागतात.' या वाक्यातील अव्ययाचा प्रकार ओळखा.
   (1) विकल्पबोधक अव्यय (2) संकेतबोधक अव्यय
   (3) परिणामबोधक अव्यय (4) उद्देशबोधक अव्यय

2. 'खळ' या शब्दाचा अर्थ पुढीलपैकी कोणत्या गटात आढळत ***नाही*** ?
   (1) चिकट पेज, खंड, दुष्ट मनुष्य (2) छंद, दुष्ट मनुष्य, खंड
   (3) अंगण, खंड, दुष्ट मनुष्य (4) मळणी करण्याची जागा, चूर्ण करणे, चर्चा

3. 'माझ्याकडे कोण माणूस येऊन गेला.' या वाक्यात विशेषणाचा कोणता प्रकार आढळून येतो ?
   (1) गुणवाचक विशेषण (2) धातुसाधित विशेषण
   (3) संख्यावाचक विशेषण (4) सार्वनामिक विशेषण

4. शुद्ध शब्द ओळखा.
   (1) निस्पृह (2) ज्येष्ट (3) परिक्षा (4) मातु:श्री

5. 'पोषाख' हा शब्द मराठीत कोणत्या भाषेतून आला आहे ?
   (1) कानडी (2) हिंदी (3) अरबी (4) फारसी

6. 'कवी' या शब्दाचे स्त्रीलिंगी रूप पुढीलपैकी कोणत्या पद्धतीने होते ?
   अ. कवी ब. कवियत्री
   क. कवयित्री ड. काव्यकर्त्री

   (1) फक्त अ आणि ब (2) फक्त क आणि ड
   (3) फक्त ब आणि क (4) फक्त क आणि ड

7. खाली दिलेल्या शब्दातील प्रत्ययघटित शब्द ओळखा.
   (1) आहार (2) पडजीभ (3) भांडखोर (4) कमनशीब

8. वेगळा गट ओळखा.
   अ. क्, ख्, ग्, घ्, ङ्
   ब. च्, छ्, ज्, झ्, ञ्
   क. ट्, ठ्, ड्, ढ्, ण्
   ड. य्, र्, ल्, व्, श्

   (1) फक्त ब (2) फक्त क आणि ड
   (3) फक्त ड (4) फक्त अ

**9.** जोड्या लावा :

| *उच्चारस्थान* | | | *व्यंजने* |
|---|---|---|---|
| अ. | दंत | I. | ट्, ठ्, ड्, ढ् |
| ब. | ओष्ठ्य | II. | ङ्, ञ्, ण्, न् |
| क. | अनुनासिक | III. | प्, फ्, ब्, भ् |
| ड. | मूर्धन्य | IV. | त्, थ्, द्, ध् |

अचूक उत्तरासाठी पुढील योग्य पर्याय निवडा.

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| (1) | I | II | III | IV |
| (2) | IV | III | II | I |
| (3) | III | IV | I | II |
| (4) | II | I | IV | III |

**10.** 'टोपलीतील <u>पिकलेला</u> पेरू घे.' या वाक्यातील अधोरेखित शब्द पुढीलपैकी कोणत्या प्रकारचा आहे ?

(1) धातुसाधित विशेषण (2) क्रियाविशेषण

(3) क्रियापद (4) विधिविशेषण

**11.** मराठी भाषा लेखन नियमानुसार शुद्ध असलेला शब्द निवडा.

(1) अध्यात्मिक (2) आध्यात्मीक

(3) अध्यात्मीक (4) आध्यात्मिक

**12.** 'पाची बोटे सारखी नसतात' या म्हणीच्या विरुद्ध अर्थाची म्हण पुढीलपैकी कोणती ?

(1) पळसाला पाने तीन (2) पांचामुखी परमेश्वर

(3) जनी जनार्दन (4) तेरड्याचा रंग तीन दिवस

**13.** खाली शब्द व त्यांचे प्रकार दिले आहेत, त्यातील ***चुकीची*** शब्दजोडी निवडा.

(1) इंग्रजी भाषेतून मराठीत आलेले शब्द – बटन, तिकीट, बस, कार्ड

(2) पोर्तुगीज भाषेतून मराठीत आलेले शब्द – बटाटा, कोबी, हापूस, फणस

(3) फारसी भाषेतून मराठीत आलेले शब्द – हकीकत, अत्तर, हुकूम, पेशवा

(4) अरबी भाषेतून मराठीत आलेले शब्द – इनाम, मेहनत, जाहीर, मंजूर

**खालील उतारा वाचून त्याच्या खाली दिलेल्या प्रश्नांची (प्रश्न क्र. 14 ते 18) उत्तरे अचूक निवडा.**

भाषा ही मुळात बोलली जाते, आणि लिखित म्हणजे लिपिबद्ध भाषा ही दुय्यम स्वरूपाची असते, हे तत्त्व कोणत्याही प्रकारच्या लेखनाचा विचार करतांना नेहमी लक्षात ठेवावे लागते. बोलभाषा प्रधान आणि लिखित भाषा गौण असणे मानवी समाजाच्या इतिहासावरुनही लक्षात येते, कारण लिप्यांचा शोध तीन-चार हजार वर्षांपलिकडे जात नाही. आजही शंभर टक्के निरक्षर असलेले अनेक समाज पृथ्वीवर अस्तित्वात असून त्यांच्या बोलभाषा अत्यंत प्रभावी व इतर कोणत्याही प्रगत समाजाच्या भाषांइतक्याच सक्षम आहेत. हिंदूस्तानातही पन्नास टक्के लोक भाषा फक्त बोलतात, लिहीत नाहीत.

लिखित भाषेचे हे गौण स्वरूप मान्य केल्यावर लेखनप्रक्रियेचे काही गुणधर्म लक्षात घ्यावे लागतात, जे बोलभाषेहून केवळ पद्धतीने नव्हे, तर प्रकारानेही स्वतंत्र ठरतात. मेंदूला जाणवणारे संबोधन भाषिक प्रक्रियेत व्यक्त होताना लेखनप्रक्रिया बोलण्याच्या प्रक्रियेपेक्षा अधिक आंतरिक, अर्थाच्या गाभ्याशी अधिक संलग्न राहून सुक्ष्मतर शैलीचे प्रकट करीत राहते. त्यामुळे आपण भाषण आणि लेखन यांच्यातला फरक केवळ बोलणे आणि लिहिणे, ह्या सामान्य क्रियांइतका वरवरचा राहत नाही. लेखनात संवेदनशीलता प्रकर्षाने उमटवण्याची खास शक्ती असते. साहित्याला आवश्यक अशा आत्मसंवादी वृत्तीचे थेट लिपीकरण लेखनप्रक्रियेच्या अशा शक्तीमुळे सुकर होते. स्वगतपरता हा लेखनप्रक्रियेचा पाया असतो. केवळ बोलण्याला दुसऱ्याशी संवाद करण्याचा, संदेशवहनाचा पाया असतो. विशेषत: साहित्य ही कला आत्मनिष्ठ होऊ लागल्यापासून लिखित भाषेचे स्वत:चे तर्कशास्त्र साहित्याच्या परंपरेतून स्पष्ट होत आले आहे. साहित्याचे मौखिक आणि लिखित असे विभाजन केले, तरी मौखिक साहित्याची भाषिक शैली अधिक संदेशवहनपर असते, अधिक समूहनिष्ठ असते, तर लिखित साहित्याची भाषिक शैली अधिक आत्मपर, अधिक संवेदनशील असते. लिहिलेला मजकूर सर्वांना उपलब्ध होऊ शकतो. तो अधिक टिकाऊ व मुळाबर-हुकूम असतो.

लिखित भाषा ही बोलण्याचे केवळ दृश्य स्वरूप नसून तिच्यात शैलीचेही गुण बदलतात. ह्यामुळे साहित्याच्या लिखित भाषेत गद्याचा विकास प्राय:लेखनप्राधान्यामुळे होत गेला. बोललेले हवेत चटकन विरते. त्यामुळे बोलभाषेतील साहित्यकृतीला काही नादमय प्रयुक्त्यांचा आधार घ्यावा लागतो. आखूड ओळी, अनुप्रासाचे आधिक्य, छंदोबद्धता, पुनरावृत्ती, यमके, यती, धृपद अशा श्रवणसुलभ रूपघटकांचा मौखिक साहित्याला आधार घ्यावा लागतो. लिखित साहित्याला स्मरणशक्तीवर अवलंबून राहण्याची गरज नसते. वाचनाची दृश्यसुकरता लिखित साहित्याला जोपासावी लागल्यामुळे विरामचिन्हांचे, ओळींच्या लांबीचे, लिहिण्याच्या किंवा छापण्याच्या शैलीचे महत्त्व अशा साहित्यकृतींमध्ये भाषिक शैलीचा अविभाज्य भाग म्हणून येते.

**14.** मौखिक साहित्याला खालीलपैकी कोणत्या गोष्टीचा आधार घ्यावा लागतो ? असे लेखकाचे मत आहे.

(1) युक्त्या प्रयुक्त्यांचा

(2) काही नादमय प्रयुक्त्यांच्या

(3) श्रवणदुर्लभ रूपघटकांचा

(4) श्रवणसुलभ प्रयुक्त्यांचा

---

**15.** साहित्याच्या लिखित भाषेत गद्याचा विकास कशामुळे होत गेला ? असे लेखकाला वाटते.

(1) नादमय प्रयुक्त्यांचा आधार घेतल्यामुळे

(2) लेखनाच्या दृश्य स्वरूपामुळे

(3) प्राय:लेखनप्राधान्यामुळे

(4) बोललेले हवेत विरून जाण्यामुळे

---

**16.** लेखनात कशाची खास शक्ती असते, असे लेखकाचे मत आहे ?

(1) दुसऱ्याशी संवाद करण्याची

(2) संवेदनशीलता प्रकर्षाने उमटवण्याची

(3) आत्मसंवादाचे थेट लिपीकरण करण्याची

(4) स्वगतपरता अव्यक्त ठेवण्याची

---

**17.** लिखित साहित्याच्या भाषिक शैलीचे स्वरूप कसे आहे, ते खालील पर्यायांमधून अचूक पर्याय निवडून सांगा.

(1) अधिक समूहनिष्ठ असते

(2) संदेशवहनपर असते

(3) अधिक आत्मपर, अधिक संवेदनशील असते

(4) अधिक तर्कनिष्ठ असते

---

**18.** भाषा मुळात काय केली जाते ? खालील पर्यायांमधून अचूक पर्याय निवडा.

(1) लिहिली जाते

(2) लिपिबद्ध केली जाते

(3) दुय्यम स्वरूपात ठेवली जाते

(4) बोलली जाते

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**19.** 'रात्र' या शब्दाच्या समानार्थी पर्यायांचा पुढीलपैकी गट कोणता ?

(1) प्राची, शशिनी, उषा
(2) संध्या, तमिस्रा, उषा
(3) रजनी, निशा, यामिनी
(4) प्राची, रजनी, संध्या

---

**20.** पुढे दिलेल्या शब्दजोड्यांमधून समानार्थी योग्य असलेली शब्दजोडी निवडा.

(1) पुत्र – तनुज (2) अमर – मर्त्य (3) अग्नि – पवन (4) सूर्य – नृप

---

**21.** इंग्रजी नसलेला शब्द ओळखा.

(1) साहेब (2) नंबर (3) स्टेशन (4) मोटर

---

**22.** विसंगत गट ओळखा.

अ. अचल, नग, शैल, भूधर
ब. अंबू, पय, नीर, तोय
क. कांता, दारा, जाया, सरिता
ड. प्रख्यात, नामांकित, ख्यातनाम, विख्यात

(1) फक्त अ आणि ब
(2) फक्त क
(3) फक्त ड
(4) फक्त अ

---

**23.** 'कायदेशीर' याच्या विरुद्ध अर्थ व्यक्त करणारा शब्द पुढीलपैकी कोणता ?

(1) अवैद्य (2) अवैध (3) वैध (4) अवैध्य

---

**24.** पुढे दिलेल्या दोन गटांच्या योग्य जोड्या जुळवा.

अ. तलाव I. कुरंग
ब. मुख II. असूद
क. हरिण III. सारस
ड. रक्त IV. आनन

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | III | IV | II | I |
| (2) | II | III | IV | I |
| (3) | IV | II | I | III |
| (4) | III | IV | I | II |

---

**25.** आमचे शरीर सुदृढ व्हावे, म्हणून आम्ही दररोज योगासने करतो – वाक्य प्रकार ओळखा.

(1) विकल्पबोधक संयुक्त वाक्य
(2) कारणबोधक मिश्र वाक्य
(3) उद्देशबोधक मिश्र वाक्य
(4) संकेतबोधक मिश्र वाक्य

**26.** Identify the correct meaning of the underlined part.

Every mortal has to pay the debt of nature one day.

(1) to bear the expenses (2) to die
(3) to face difficulties (4) to return his money

**27.** What does the underlined modal auxiliary suggest ?

You can go now.

(1) Permission (2) Possibility
(3) Ability (4) Request

**28.** Select the correct alternative to complete the sentence meaningfully.

Plans may ________ due to insufficient funds.

(1) fall out (2) fall apart
(3) fall off (4) fall through

**29.** Choose the correct word.

His handwriting is not __________ .

(1) legible (2) eligible
(3) ineligible (4) illegal

**30.** Identify the correct sentence.

a. The flowers smell sweet.
b. She looks charmingly.

(1) a only (2) b only (3) Both a and b (4) Neither a nor b

**31.** Choose the correct sentence from the options given.

(1) He prevented me to go their.
(2) He prevented me going.
(3) He prevented me from going there.
(4) He prevented me for going there.

**32.** Identify the sentences punctuated correctly.

a. I like poems, stories and prose.
b. Mango, apple, date, almond, walnut, watermelon, etc. are useful fruits.
c. I woke up; I got out of bed.

(1) a and c only (2) a and b only
(3) b and c only (4) All of the above

**33.** Choose the correct pronoun.
__________ do you wish to see ?

(1) Who (2) Whom (3) Whose (4) None of the above

**34.** Choose the correct question tag(s).
a. We must go now, mustn't we ?
b. You aren't leaving, aren't you ?
c. You can drive, can't you ?

(1) a and c only (2) b and c only (3) c only (4) a, b and c

**35.** Identify the correct passive voice of the given sentence.

What do you do now ?

(1) What has been done by you, now ?
(2) What is being done by you, now ?
(3) What are you doing now ?
(4) What has been being done by you, now ?

**36.** Choose the best indirect form of the given sentence.
"Do you suppose you know better than your own father ?" jeered his angry mother.

(1) His angry mother jeers and asks whether he supposed that he knew better than his own father.
(2) His angry mother jeered and asked that he supposed whether he knew better than his own father.
(3) His angry mother jeered and asked whether he supposed that he knew better than his own father.
(4) His angry mother jeered and asked whether he supposed that he knows better than his own father.

**37.** Identify the correct indirect narration of the sentence given below :

He says, "I am working hard."

(1) He said that he was working hard. (2) He says that he is working hard.
(3) He says he is working hard. (4) He said that he is working hard.

**38.** Identify the clause underlined.

Those <u>who are honest</u> succeed in life.

(1) Noun clause (2) Adjective clause
(3) Adverb clause of reason (4) Adverb clause of condition

**39.** Change the voice.
Mr. Krishnaji teaches us grammar.
(1) Grammar teaches us Mr. Krishnaji.
(2) We are taught grammar by Mr. Krishnaji.
(3) We are taught by Mr. Krishnaji, grammar.
(4) Grammar teaches us by Mr. Krishnaji.

**Read the following passage carefully and answer the questions given below it :**

Since the most ancient times India has been not only periodically invaded by greedy hordes, but also visited by tradesmen and travellers, scholars and sight-seers. Some of them have written books. The books of these writers have become all the more important because there are not too many of them, and they have served as rich sources for the historians. It is especially in this context that observations provided by the great Chinese writer Hiuen Tsang became very relevant.

Already in the 7th century, Buddhism was a powerful cultural force among the educated classes of China. It was common for Chinese pilgrims to come to India, the native land of the Buddha, to pay their respects to the founder of their religion. Perhaps the most famous of them all was this gentle observer who has studied and travelled extensively in China before entering the Indian sub-continent. Being both scholarly and sophisticated, he was not given to easy praise. Within India itself he traversed deserts and climbed mountains, stayed in villages and lived in capitals, practised in monasteries and studied in universities and spent time in some royal courts as well.

He went to Mathura and Ayodhya, to Prayag and Pàtaliputra, to Gaya and Kamarupa. He studied Sanskrit and Pali to delve deeper into Buddhist philosophy and Hindu traditions. Most important of all, he wrote down in detail his many experiences and impressions.

---

**40.** The purpose of Hiuen Tsang to travel to India was
(1) to study the influence of Buddhism on Hindu religion.
(2) to spread his religion in India.
(3) to undertake pilgrimage and enhance knowledge.
(4) to study powerful cultural forces in India.

---

**41.** Which of the following has been considered as the real contribution of Hiuen Tsang ?
(1) He meticulously recorded his experiences and feelings.
(2) He pointed out the impact of Hinduism on Buddhism.
(3) He visited and spent time in many places in India.
(4) He influenced the elite in China to visit India.

---

**42.** The writings of Hiuen Tsang are considered as relevant because
(1) he had spent some time in royal courts.
(2) he was a scholar and gentle observer.
(3) he visited India as a tradesman.
(4) None of the above

---

**43.** Choose the word which is most nearly the same in meaning of the word given below as used in the passage.
Pay
(1) Offer (2) Settle (3) Remit (4) Reward

---

**44.** Choose the word which is most opposite in meaning of the word given below as used in the passage.
Common
(1) Different (2) Rarely (3) Distinct (4) Separate

---

**45.** Match the synonyms :

| | *I* | | *II* |
|---|---|---|---|
| a. | Aptitude | I. | Universe |
| b. | Cosmos | II. | Decisive |
| c. | Genuine | III. | Talent |
| d. | Crucial | IV. | Authentic |

| | **a** | **b** | **c** | **d** |
|---|---|---|---|---|
| (1) | III | I | IV | II |
| (2) | II | I | III | IV |
| (3) | IV | I | II | III |
| (4) | II | IV | I | III |

**46.** Pick out the sentence in comparative degree.

(1) Shakuntala is the best drama in Sanskrit.

(2) Mahabaleshwar is more cooler than Matheran.

(3) Mumbai is more crowded than Pune.

(4) Mumbai is more crowder than Pune.

**47.** Identify the word/phrase given below that can replace the word/phrase underlined to make the sentence meaningful.

I <u>reversed</u> my jacket.

(1) upturned (2) changed

(3) overturned (4) turned inside out

**48.** Choose the correct reported speech of the following sentence :

She said to me, "Shut the door."

(1) She said to me to shut the door. (2) She asked me to shut the door.

(3) She told to me to shut the door. (4) She said to shut the door.

**49.** Choose the correct sentence(s).

a. I have got Indira's letter yesterday.

b. I saw him at the Bhusaval station last month.

c. You have met Fatima at the station ?

(1) a only (2) b only (3) c only (4) a, b and c

**50.** Choose the correct alternative for the blank.

I __________ this film four times.

(1) have seen (2) am seeing

(3) was seeing (4) have been seeing

51. भारतातील औद्योगिक वादाची कारणे

(1) वेतन वाढ (2) बोनसची मागणी

(3) कामाचे तास, रजा व सुट्या (4) वरील सर्व

The cause(s) of industrial disputes in India was/were

(1) Increasing wages (2) Demand of bonus

(3) Working hours, leaves and holidays (4) All of the above

---

52. खालील विधाने विचारात घ्या :

अ. देशांतर्गत व्यापार भिन्न देशांमध्ये होतो.

ब. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या मूलभूत प्रक्रिया आयात आणि निर्यात आहेत.

क. जेव्हा आंतरराष्ट्रीय व्यापार दोन देशांमध्ये होतो, तो उभयपक्षी व्यापार होय.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने ***असत्य*** आहे/आहेत ?

(1) फक्त अ आणि ब (2) फक्त ब आणि क (3) फक्त अ (4) फक्त क

Consider the following statements :

a. Domestic trade takes place between different countries.

b. Export and import are the basic processes of international trade.

c. When international trade takes place between two countries it is called bilateral trade.

Which of the statement/s given above is/are ***incorrect*** ?

(1) a and b only (2) b and c only (3) a only (4) c only

---

53. खालील विधाने विचारात घ्या :

अ. जागतिक व्यापार संघटनेचे विकसनशील देशांना तांत्रिक मदत आणि प्रशिक्षण देणे हे कार्य आहे.

ब. दक्षिण-पूर्व आशिया राष्ट्रांच्या संघटनेचे कच्चा तेलाचे आंतरराष्ट्रीय व्यापारातील नियंत्रण हे कार्य आहे.

क. ब्रिक्स संघटनेचे सभासद देशांच्या अर्थव्यवस्था वृद्धिसाठी निधी उपलब्ध करुन देणे हे कार्य आहे.

वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?

(1) फक्त अ आणि क (2) फक्त अ आणि ब (3) फक्त ब आणि क (4) वरील सर्व

Consider the following statements :

a. Providing technological assistance and training to developing countries is a function of the World Trade Organisation.

b. Controlling the international trade of crude oil is a function of the Association of South-East Asian Nations.

c. Making funds available for growth of economies of members is a function of BRICS.

Which of the statements given above are correct ?

(1) a and c only (2) a and b only (3) b and c only (4) All of the above

---

**54.** आपल्या देशात "बँकाची बँक" म्हणून ओळखली जाते.

अ. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया
ब. व्यापारी बँक
क. स्टेट बँक ऑफ इंडिया
ड. वरीलपैकी कोणतेही नाही

(1) फक्त अ (2) फक्त अ आणि ब (3) फक्त अ, ब आणि क (4) फक्त ड

The "Bankers' Bank" in our country is known as

a. Reserve Bank of India
b. Commercial Bank
c. State Bank of India
d. None of the above

(1) a only (2) a and b only (3) a, b and c only (4) d only

---

**55.** व्यापारी बँक पुढील कार्य करते.

अ. चलन निर्मिती चे कार्य
ब. सरकारची बँक म्हणून कार्य

(1) फक्त अ (2) फक्त ब
(3) वरील दोन्ही (4) वरीलपैकी नाहीत

A Commercial Bank does the following functions :

a. Function of issuing currency
b. Functions as a banker to the Government

(1) a only (2) b only
(3) Both of the above (4) None of the above

---

**56.** लोकसंख्या संक्रमण सिद्धांतानुसार खालील विधाने विचारात घ्या :

अ. पहिल्या अवस्थेत अर्थव्यवस्था प्राचीन आणि मागासलेली असते.
ब. दुसऱ्या अवस्थेत लोकसंख्येची वृद्धि जलद होते.
क. तिसऱ्या अवस्थेत शहरीकरण आणि औद्योगिकीकरण जलद होते.
ड. 1921 नंतर भारताने दुसऱ्या अवस्थेत प्रवेश केला.

खालीलपैकी कोणते विधाने बरोबर आहेत ?

(1) फक्त अ आणि ब (2) फक्त ब आणि क (3) फक्त क आणि ड (4) वरील सर्व

Consider the following statements according to demographic transition :

a. In Stage I an economy is primitive and backward.
b. In Stage II there is rapid growth of population.
c. In Stage III fast industrialisation and urbanisation takes place.
d. India entered Stage II after 1921.

Which of the statements given above are correct ?

(1) a and b only (2) b and c only (3) c and d only (4) All of the above

57. रिझर्व्ह बँकेची पत नियमांची साधने पुढील प्रमाणे आहेत

अ. संख्यात्मक पत नियमांची साधने

ब. गुणात्मक पत नियमांची साधने

(1) फक्त अ (2) फक्त ब

(3) वरीलपैकी नाहीत (4) अ आणि ब दोन्ही

The means of credit control of R.B.I. is/are

a. Quantitative measures of credit control

b. Qualitative measures of credit control

(1) a only (2) b only

(3) None of the above (4) Both a and b

---

58. 2011 च्या आकडेवारीवरून लोकसंख्येची घनता असलेले केंद्रशासित प्रदेश यांच्या जोड्या लावा :

| | *केंद्रशासित प्रदेश* | | *घनता* |
|---|---|---|---|
| अ. | दिल्ली एन.सी.टी. | I. | 2547 |
| ब. | चंडीगढ | II. | 9258 |
| क. | पांडिचेरी | III. | 11320 |
| ड. | दमन व दिव | IV. | 2191 |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | III | II | I | IV |
| (2) | II | III | IV | I |
| (3) | IV | I | III | II |
| (4) | III | IV | II | I |

As per the Census of 2011, match the Union territory with the density of population :

| | *Union Territory* | | *Density of Population* |
|---|---|---|---|
| a. | Delhi N.C.T. | I. | 2547 |
| b. | Chandigarh | II. | 9258 |
| c. | Pondicherry | III. | 11320 |
| d. | Daman and Diu | IV. | 2191 |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | III | II | I | IV |
| (2) | II | III | IV | I |
| (3) | IV | I | III | II |
| (4) | III | IV | II | I |

**59.** खालील विधाने विचारात घ्या :

अ. मुख्यमंत्री हा भारतातील नियोजन मंडळाचा पद्सिद्ध अध्यक्ष असतो.

ब. भारतामध्ये आर्थिक नियोजनाची सुरूवात 1947 मध्ये झाली.

क. भारतामध्ये पहिल्या वार्षिक नियोजनाची अंमलबजावणी 1978 – 80 काळामध्ये झाली.

वरीलपैकी कोणते विधाने ***असत्य*** आहेत ?

(1) फक्त अ आणि ब (2) फक्त ब आणि क (3) फक्त अ आणि क (4) वरील सर्व

Consider the following statements :

a. Chief Minister is the ex-officio Chairman of the Planning Commission in India.

b. In India, economic planning started in 1947.

c. In India, first annual plan was implemented in period 1978 – 80

Which of the statements given above are ***incorrect*** ?

(1) a and b only (2) b and c only (3) a and c only (4) All of the above

---

**60.** खालील जोड्या लावा :

| | *I* | | *II* |
|---|---|---|---|
| अ. | इंदिरा आवास योजना (IAY) | I. | 1985 – 86 |
| ब. | जवाहर रोजगार योजना (JRY) | II. | 1980 |
| क. | स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना (SGSY) | III. | 1999 |
| ड. | एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP) | IV. | 1989 |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | I | IV | III | II |
| (2) | III | I | II | IV |
| (3) | II | III | IV | I |
| (4) | IV | II | I | III |

Match the following pairs :

| | *I* | | *II* |
|---|---|---|---|
| a. | Indira Awaas Yojana (IAY) | I. | 1985 – 86 |
| b. | Jawahar Rojgar Yojana (JRY) | II. | 1980 |
| c. | Swarnajayanti Gram Swarozgar Yojana (SGSY) | III. | 1999 |
| d. | Integrated Rural Development Programme (IRDP) | IV. | 1989 |

| | **a** | **b** | **c** | **d** |
|---|---|---|---|---|
| (1) | I | IV | III | II |
| (2) | III | I | II | IV |
| (3) | II | III | IV | I |
| (4) | IV | II | I | III |

61. राज्याचा राज्यपाल हा

(1) राज्याचा प्रमुख आहे

(2) शासनाचा प्रमुख आहे

(3) विधिमंडळाचा प्रमुख आहे

(4) राज्याचा आणि शासनाचा प्रमुख आहे

The Governor of a State is

(1) the head of the State

(2) the head of the Government

(3) the head of the Legislature

(4) the head of the State and Government

---

62. राज्याचा महाधिवक्ता यांच्या बाबतीत खालीलपैकी कोणते विधान बरोबर ***नाही*** ?

(1) त्याची नियुक्ती राज्यपालाद्वारे होते.

(2) उच्च न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून नियुक्त होण्यासाठी जी अर्हता आवश्यक असते, ती अर्हता त्याच्याजवळ असणे आवश्यक असते.

(3) राज्यपालांची मर्जी असेपर्यंत तो पदावर राहू शकतो.

(4) महाधिवक्ता पदाचा कार्यकाळ पाच वर्षे असतो.

Which one of the following statements about the Advocate General of the State is ***not*** correct ?

(1) He is appointed by the Governor.

(2) He must be a person who is qualified to be appointed as a judge of a High Court.

(3) He holds office during the pleasure of the Governor.

(4) The term of office of the Advocate General is five years.

---

63. जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीचा पद्‌सिद्ध सचिव कोण असतो ?

(1) मुख्य कार्यकारी अधिकारी

(2) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(3) उप मुख्य कार्यकारी अधिकारी

(4) कार्यकारी अभियंता

Who is the ex-officio Secretary of the Standing Committee of Zilla Parishad ?

(1) Chief Executive Officer

(2) Additional Chief Executive Officer

(3) Deputy Chief Executive Officer

(4) Executive Engineer

---

**64.** पदवीधर मतदार संघातुन विधानपरिषदेवर निवडून दिल्या जाणाऱ्या सदस्यांची संख्या किती ?

(1) परिषदेच्या एकूण सदस्यांच्या 1/3

(2) परिषदेच्या एकूण सदस्यांच्या 1/6

(3) परिषदेच्या एकूण सदस्यांच्या 1/2

(4) परिषदेच्या एकूण सदस्यांच्या 1/12

How many number of members are required to be elected to the Legislative Council by the Graduates ?

(1) $1/3^{rd}$ of the total members of the Council

(2) $1/6^{th}$ of the total members of the Council

(3) 1/2 of the total members of the Council

(4) $1/12^{th}$ of the total members of the Council

---

**65.** खालीलपैकी कोणत्या स्थळी 3 ते 5 फेब्रु, 2017 या दरम्यान 90वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरते ?

(1) घुमान

(2) डोंबिवली

(3) सासवड

(4) ठाणे

At which of the following places was the $90^{th}$ Akhil Bharatiya Marathi Sahitya Sammelan held from $3^{rd}$ to $5^{th}$ Feb. 2017 ?

(1) Ghuman

(2) Dombivali

(3) Saswad

(4) Thane

---

**66.** खालीलपैकी कोणत्या वर्षी भारत सरकार व नेपाळ सरकारने शांतता व मैत्रीच्या करारावर स्वाक्षरी केली ?

(1) 1962 (2) 1950

(3) 1972 (4) 1955

In which of the following years, was the Treaty of Peace and Friendship signed between the Government of India and the Government of Nepal ?

(1) 1962 (2) 1950

(3) 1972 (4) 1955

**67.** 'पूर्वे कड़े पहा' या धोरणाचा उद्देश आहे.

(1) पूर्व आशियांची देशांसोबत व्यापारी व सांस्कृतिक संबंध वाढविणे

(2) शीतयुद्धात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणे

(3) पूर्व आशियात देशांचे सामरिक विस्तार करणे

(4) चीन सोबत सशक्त संबंध स्थापित करणे

The object of 'Look East' policy is

(1) To increase trade and cultural relations with East Asian countries

(2) To play an important role in the Cold War

(3) Strategic extension in East Asian countries

(4) Strengthen relations with China

---

**68.** 'वन बेल्ट वन रोड' (OBOR) प्रकल्प हा ______ या देशाच्या शासनाचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आहे.

(1) भारत (2) चीन

(3) ईरान (4) श्रीलंका

'One Belt One Road' (OBOR) project is an ambitions programme of the Government of

(1) India (2) China

(3) Iran (4) Sri Lanka

---

**69.** 'ए.आय.एफ. डैम' जे पुर्वी 'सलमा धरण' म्हणून ओळखले जाई, ते कोणत्या देशात आहे ?

(1) बांग्लादेश (2) अफगानिस्तान

(3) नेपाळ (4) पाकिस्तान

In which country is the 'AIF Dam', formerly known as 'Salma Dam' situated ?

(1) Bangladesh (2) Afghanistan

(3) Nepal (4) Pakistan

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

70. खालीलपैकी कोणता देश हा 'बहुक्षेत्रीय तांत्रिक आणि आर्थिक सहकार्यासाठी उपक्रम' (BIMSTEC) चा सदस्य *नाही* ?

(1) पाकिस्तान (2) भूतान (3) म्यानमार (4) नेपाळ

Which one of the following countries is ***not*** a member of the 'Multi-Sectoral Technical and Economic Cooperation (BIMSTEC) ?

(1) Pakistan (2) Bhutan (3) Myanmar (4) Nepal

71. जोड्या जुळवा :

| *न्यायमूर्ति* | | *कोणत्या उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ति* | |
|---|---|---|---|
| अ. | मंजूळा चेल्लूर | I. | कलकत्ता |
| ब. | जी. रोहिणी | II. | मद्रास |
| क. | इंदिरा बॅनर्जी | III. | दिल्ली |
| ड. | नितीशा म्हात्रे | IV. | मुंबई |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | I | II | III | IV |
| (2) | IV | III | II | I |
| (3) | IV | II | III | I |
| (4) | IV | I | II | III |

Match the pairs :

| *Justice* | | *Chief Justice of which High Court* | |
|---|---|---|---|
| a. | Manjula Chellur | I. | Calcutta |
| b. | G. Rohini | II. | Madras |
| c. | Indira Banerjee | III. | Delhi |
| d. | Nishita Mhatre | IV. | Mumbai |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | I | II | III | IV |
| (2) | IV | III | II | I |
| (3) | IV | II | III | I |
| (4) | IV | I | II | III |

72. खालीलपैकी कोणाची 'राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे' अध्यक्ष म्हणून नेमणूक झाली आहे ?

(1) मोहनभाई कुंडारिया (2) सांवर लाल जाट

(3) राम शंकर कथेरिया (4) मनसुखभाई वसावा

Who amongst the following was appointed as the Chairman of the 'National Commission for Scheduled Castes' ?

(1) Mohanbhai Kundaria (2) Sanwar Lal Jat

(3) Ram Shankar Katheria (4) Mansukhbhai Vasava

---

73. बजेट 2017 – 18 मधे 'टेक इंडिया' च्या उद्देशात खालीलपैकी काय ***नाही*** ?

(1) शासन गुणवत्ता आणि जनतेचा जीवन स्तर बदलणे.

(2) विदेश संबंधाना सशक्त करणे.

(3) युवक आणि कमकुवत घटकांना बळवान करणे.

(4) भ्रष्टाचार व काळा पैशाचे निर्मूलन.

Which of the following is ***not*** the object of 'TECH INDIA' in the Budget 2017 – 18 ?

(1) To change the quality of governance and livelihood of public.

(2) To strengthen foreign relations.

(3) To strengthen the youth and weaker sections of the society.

(4) Eradication of black money and corruption.

---

74. "प्रधानमंत्री सुकन्या समृद्धी योजनेत" कोणत्या बाबीचा समावेश ***नाही*** ?

(1) मुलीच्या नावाने बचत खाते उघडणे

(2) वयाची 18 वर्षे पूर्ण झाल्यावर 50% रक्कम लग्न व शिक्षणासाठी काढता येते

(3) ठेवी 14 वर्षे ठेवल्या जावू शकतात

(4) किमान ठेव ₹ 100 आहे

Which is ***not*** included in the "Pradhanmantri Sukanya Samriddhi Yojana" ?

(1) To open savings account in the name of girls

(2) 50% of amount can be withdrawn for marriage and education of a girl after completion of 18 years

(3) Deposits can be made for 14 years

(4) Minimum deposit is ₹ 100

---

75. इसरो ने नुकतेच 104 उपग्रह आकाशात सोडून कोणत्या देशांचा उच्चांक मोडला ?

(1) चीन (2) अमेरिका/यू.एस.ए. (3) रशिया (4) फ्रांस

Which country's record is broken by ISRO by launching 104 satellites ?

(1) China (2) USA (3) Russia (4) France

---

76. डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी पीपल्स एज्युकेशन संस्थेद्वारे मुंबईत पुढीलपैकी कोणते महाविद्यालय सुरू केले ?

(1) मिलिंद महाविद्यालय (2) एल्फिन्स्टन महाविद्यालय

(3) सिद्धार्थ महाविद्यालय (4) महात्मा फुले महाविद्यालय

Which of the following colleges was started at Mumbai by Dr. Babasaheb Ambedkar through the People's Education Society ?

(1) Milind College (2) Elphinstone College

(3) Siddhartha College (4) Mahatma Phule College

---

77. राजर्षी छत्रपति शाहू महाराजाना महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी कुठे पाठविले होते ?

(1) मुंबई (2) कलकत्ता (3) राजकोट (4) बडोदा

Where was Rajarshi Chhatrapatti Shahu Maharaj sent for his higher education ?

(1) Mumbai (2) Calcutta (3) Rajkot (4) Baroda

---

78. इ. स. 1919 मध्ये सरकारने महर्षी धोंडो केशव कर्वे यांना कोणता पुरस्कार दिला होता ?

(1) महात्मा (2) कैसर-ए-हिंद

(3) भारत पुत्र (4) महर्षी

Which award was given to Maharshi Dhondo Keshav Karve in 1919 by the Government ?

(1) Mahatma (2) Kaiser-i-Hind

(3) Bharat Putra (4) Maharshi

---

79. योग्य कालानुक्रमानुसार खालील संस्थेंची मांडणी करा :

अ. इंडियन असोसिएशन

ब. बॉम्बे असोसिएशन

क. पुणे सार्वजनिक सभा

ड. मद्रास महाजन सभा

(1) ब, क, अ, ड (2) अ, ब, क, ड (3) ब, क, ड, अ (4) ड, क, ब, अ

Arrange the following associations in correct chronological order :

a. Indian Association

b. Bombay Association

c. Pune Sarvajanik Sabha

d. Madras Mahajana Sabha

(1) b, c, a, d (2) a, b, c, d (3) b, c, d, a (4) d, c, b, a

80. __________ हे लोकहितवादी म्हणून ओळखले जातात.

(1) गोविंद विठ्ठल कुंटे (2) गोपाळ हरी देशमुख

(3) विष्णुशास्त्री पंडित (4) गोपाळ गणेश आगरकर

________ was commonly known as Lokhitawadi.

(1) Govind Vitthal Kunte (2) Gopal Hari Deshmukh

(3) Vishnushastri Pandit (4) Gopal Ganesh Agarkar

---

81. कोणत्या कायद्याने ईस्ट इंडिया कंपनीची भारता बरोबर व्यापार करण्याची मक्तेदारी संपुष्टात आली ?

(1) चार्टर ॲक्ट 1813 (2) चार्टर ॲक्ट 1833

(3) चार्टर ॲक्ट 1853 (4) चार्टर ॲक्ट 1873

Which Act ended East India Company's monopoly over trade with India ?

(1) The Charter Act of 1813 (2) The Charter Act of 1833

(3) The Charter Act of 1853 (4) The Charter Act of 1873

---

82. 'वेदाकडे परत जा' ही घोषणा कोणी दिली ?

(1) राजा राम मोहन रॉय (2) स्वामी विवेकानंद

(3) दयानंद सरस्वती (4) डॉ. आत्माराम पांडुरंग

Who gave the call 'Back to the Vedas' ?

(1) Raja Ram Mohan Roy (2) Swami Vivekanand

(3) Dayanand Saraswati (4) Dr. Atmaram Pandurang

---

83. होमरूल चळवळ कोणी सुरू केली ?

(1) ॲनी बेझंट व लोकमान्य टिळक

(2) नामदार गोखले व ॲनी बेझंट

(3) न्या. रानडे व लोकमान्य टिळक

(4) दादाभाई नौरोजी व ॲनी बेझंट

Who started the Home Rule Movement ?

(1) Annie Besant and Lokmanya Tilak

(2) Namdar Gokhale and Annie Besant

(3) Justice Ranade and Lokmanya Tilak

(4) Dadabhai Naoroji and Annie Besant

---

84. नारायण लोखंडे यांनी मुंबईत स्थापन केलेली कामगार संघटना कोणती ?

(1) बॉम्बे लेबर युनियन (2) बॉम्बे वर्कर्स असोसिएशन

(3) बॉम्बे हॉकर्स युनियन (4) बॉम्बे मिल हँड्स असोसिएशन

Which workers association did Narayan Lokhande establish in Mumbai ?

(1) Bombay Labour Union (2) Bombay Workers Association

(3) Bombay Hawkers Union (4) Bombay Mill Hands Association

85. अंबापाणीच्या उठावात पुढीलपैकी कोण *नव्हते* ?

(1) काजी सिंग (2) भागोजी नाईक

(3) दौलत सिंग (4) काळू भिवा

Who from the following was ***not*** a part of Ambapani revolt ?

(1) Kaji Singh (2) Bhagoji Naik

(3) Daulat Singh (4) Kalu Bhiva

86. फुलेंचे शेजारी __________ यांनी त्यांना शाळेत जाण्यास भाग पाडले.

(1) गाफर बेग मुन्शी (2) सार्वजनिक काका

(3) म.गो. रानडे (4) सादिक अली

__________, Phule's neighbour forced him to go to school.

(1) Gafar Beg Munshi (2) Sarvajanik Kaka

(3) M.G. Ranade (4) Sadiq Ali

87. __________ यांनी 1912 पर्यंत अस्पृश्यासाठी 23 शाळा उघडल्या आणि त्यापैकी काही महाराष्ट्राबाहेर होत्या.

(1) डॉ. भी.रा. आंबेडकर (2) शाहू महाराज

(3) विठ्ठल रा. शिंदे (4) ज्योतीबा फुले

Up to 1912 ________ established 23 schools for the untouchables and some of them were out of Maharashtra.

(1) Dr. B.R. Ambedkar (2) Shahu Maharaj

(3) Vitthal R. Shinde (4) Jyotiba Phule

88. ब्रिटिश काळात बाल कामगाराबाबत कोणता कायदा केला होता ?

(1) फॅक्टरी ॲक्ट (2) लेबर ॲक्ट

(3) चाईल्ड लेबर ॲक्ट (4) वरीलपैकी कोणताही नाही

Which of the following acts was made for Child Labour during the British period ?

(1) The Factory Act (2) The Labour Act

(3) The Child Labour Act (4) None of the above

89. भारतात कायमधारा पद्धत कोणी सुरू केली ?

(1) लॉर्ड डलहौजी
(2) लॉर्ड हेस्टिंग्ज
(3) लॉर्ड कर्झन
(4) लॉर्ड कॉर्नवालीस

Who started the Permanent Land Revenue System in India ?

(1) Lord Dalhousie
(2) Lord Hastings
(3) Lord Curzon
(4) Lord Cornwallis

---

90. मुंबई येथे 'डिप्रेस्ड क्लासेस मिशनची' स्थापना कोणी केली ?

(1) कर्मवीर भाऊराव पाटील
(2) कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे
(3) महात्मा ज्योतीबा फुले
(4) महर्षी धोंडो केशव कर्वे

Who established the 'Depressed Classes Mission' in Mumbai ?

(1) Karmveer Bhaurao Patil
(2) Karmveer Vitthal Ramji Shinde
(3) Mahatma Jyotiba Phule
(4) Maharshi Dhondo Keshav Karve

---

91. पुढील वाक्यात कोणाचे वर्णन केले आहे ?

अ. त्यांचा जन्म 6 जुलै 1837 ला मालवण येथे झाला.

ब. ते मुंबई विद्यापीठातून पदवीधर होणाऱ्या पहिल्या बॅच मध्ये होते.

क. त्यांना इंग्रजी भाषा, वाङ्मय, इतिहास आणि संस्कृत विषयांची विशेष आवड होती.

ड. 1882 मध्ये त्यांची नियुक्ती पुण्याच्या डेक्कन महाविद्यालयात संस्कृतचे प्राध्यापक म्हणून झाली होती. या पदावरील ते पहिलेच भारतीय होते.

(1) गो.ग. आगरकर
(2) भा.ह. भागवत
(3) रा.गो. भांडारकर
(4) का.त्र्यं. तेलंग

Whose description is given in the following sentences ?

a. He was born on 6 July 1837 at Malvan.

b. He belonged to the first batch of graduates from the University of Mumbai.

c. He was interested in the study of English language and literature, History and Sanskrit.

d. He was appointed as Professor of Sanskrit at the Deccan College at Poona in 1882. He was the first Indian to hold this post.

(1) G.G. Agarkar
(2) B.H. Bhagwat
(3) R.G. Bhandarkar
(4) K.T. Telang

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**92.** 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील खालील जिल्हे लोकसंख्या घनतेच्या उतरत्या क्रमाने लावा :

(1) मुंबई शहर – ठाणे – मुंबई उपनगर – पुणे

(2) मुंबई उपनगर – मुंबई शहर – पुणे – ठाणे

(3) मुंबई उपनगर – मुंबई शहर – ठाणे – पुणे

(4) मुंबई शहर – मुंबई उपनगर – ठाणे – पुणे

As per 2011 Census, arrange the following districts of Maharashtra in descending order as per their population density :

(1) Mumbai City – Thane – Mumbai Suburban – Pune

(2) Mumbai Suburban – Mumbai City – Pune – Thane

(3) Mumbai Suburban – Mumbai City – Thane – Pune

(4) Mumbai City – Mumbai Suburban – Thane – Pune

---

**93.** कोंकण रेलवेची महाराष्ट्रातील एकूण लांबी किती आहे ?

(1) 300 कि.मी.

(2) 350 कि.मी.

(3) 720 कि.मी.

(4) 382 कि.मी.

What is the total length of the Konkan Railway in Maharashtra ?

(1) 300 km

(2) 350 km

(3) 720 km

(4) 382 km

---

**94.** खालीलपैकी भारतातील सर्वात मोठे गोड्या पाण्याचे कोणते सरोवर आहे ?

(1) दल (2) भिमताल

(3) हुसेन सागर (4) वुलर

Which of the following is the largest fresh water lake in India ?

(1) Dal (2) Bhimtal

(3) Hussain Sagar (4) Wular

**95.** जोड्या जुळवा :

| | *अति पर्जन्याची ठिकाणे* | | *जिल्हे* |
|---|---|---|---|
| अ. | आंबोली | I. | रायगड |
| ब. | माथेरान | II. | कोल्हापूर |
| क. | खंडाळा | III. | सिंधुदुर्ग |
| ड. | गगनबावडा | IV. | पुणे |

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| (1) | I | II | III | IV |
| (2) | II | III | IV | I |
| (3) | III | I | IV | II |
| (4) | IV | III | II | I |

Match the following :

| | *Places of Heavy Rainfall* | | *Districts* |
|---|---|---|---|
| a. | Amboli | I. | Raigarh |
| b. | Matheran | II. | Kolhapur |
| c. | Khandala | III. | Sindhudurg |
| d. | Gaganbawada | IV. | Pune |

| | **a** | **b** | **c** | **d** |
|---|---|---|---|---|
| (1) | I | II | III | IV |
| (2) | II | III | IV | I |
| (3) | III | I | IV | II |
| (4) | IV | III | II | I |

**96.** खालीलपैकी कोणत्या मृदेने भारताचा सर्वात जास्त प्रदेश व्यापला आहे ?

(1) काळी मृदा (2) तांबडी मृदा
(3) गाळाची मृदा (4) पर्वतीय मृदा

Which of the following types of soil covers the highest total area of India ?

(1) Black soil (2) Red soil
(3) Alluvial soil (4) Mountain soil

**97.** 2011 सालच्या जनगणनेनुसार भारताच्या कोणत्या राज्यात लोकसंख्येची सर्वात कमी घनता होती ?

(1) सिक्किम (2) गोवा

(3) अरूणाचल प्रदेश (4) छत्तीसगढ

Which State of India had the lowest density of population in the 2011 Census ?

(1) Sikkim (2) Goa

(3) Arunachal Pradesh (4) Chhattisgarh

---

**98.** खालीलपैकी कोणता जलसिंचनाचा स्रोत महाराष्ट्रात मुख्य आहे ?

(1) कालवे सिंचन (2) तळी सिंचन

(3) विहिरी सिंचन (4) लिफ्ट सिंचन

Which of the following is the prime source of irrigation in Maharashtra ?

(1) Canal irrigation (2) Lake irrigation

(3) Well irrigation (4) Lift irrigation

---

**99.** नर्मदा नदीच्या पात्रात खोल, अरुंद घळया व धबधबे आहेत.

अ. नर्मदा नदी खचदरीतून वाहते.

ब. नर्मदेच्या पूर्व खोऱ्यात पश्चिम खोऱ्यापेक्षा तुलनेने पर्जन्य जास्त आहे.

क. बुर्नहर, बांजोर, शेर, तावा, हिरना, बारना या उपनद्या आहेत.

वरीलपैकी कोणती/ते विधान/ने बरोबर आहे/त ?

(1) फक्त अ (2) फक्त अ आणि ब (3) फक्त ब आणि क (4) वरील सर्व

The Narmada river has deep, narrow gorges and waterfalls.

a. It flows through the rift valley.

b. The eastern basin of Narmada has more rainfall than the western basin.

c. Burnhar, Banjor, Sher, Tawa, Hirna, Barna are the tributaries.

Which of the statements given above is/are correct ?

(1) a only (2) a and b only (3) b and c only (4) All of the above

---

**100.** भारताची सर्वात लहान सीमा खालीलपैकी कोणत्या देशाशी वाटलेली आहे ?

(1) बांगलादेश (2) म्यॉनमार

(3) अफगानिस्तान (4) पाकिस्तान

The shortest border that India shares is with which of the following countries ?

(1) Bangladesh (2) Myanmar

(3) Afghanistan (4) Pakistan

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

# सूचना - (पृष्ठ 1 वरून पुढे.....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्र. क्र. **201.** सतीची चाल नष्ट करण्यासाठी कोणी मूलत: प्रयत्न केले ?

(1) स्वामी दयानंद सरस्वती (2) ईश्वरचंद्र विद्यासागर

(3) राजा राममोहन रॉय (4) गोपाळकृष्ण गोखले

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) राजा राममोहन रॉय" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. **201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तर-क्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**